पुढारी



गडहिंग्लज : रवळनाथ हौसिंग फायनान्सच्या शाखेत प्रतिमापूजनप्रसंगी डॉ. आर. एस. निळपणकर, सविता चौगुले, महेश मजती, डॉ. संजय चौगुले, रेखा पोतदार, डी. के. मायदेव, शिवानंद घुगरे आदी.

# सभासदांच्या विश्वासावरच 'रवळनाथ'ची गरुडभरारी

- प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर : गडहिंग्लज शाखेचा २२ वा वर्धापनदिन उत्साहात

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

वेळेचे काटेकोर नियोजन, व्यवहारातील पारदर्शकता, तज्ज्ञ संचालक, कुशल कर्मचारी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सभासदांची विश्वासार्हता यामुळेच श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीने बँकिंग क्षेत्रात गरुडभरारी घेतली आहे, असे मत संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर यांनी व्यक्त केले. संस्थेच्या गडहिंग्लज शाखेच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

प्रारंभी प्राचार्य डॉ. निळपणकर यांच्या हस्ते श्री रवळनाथ व श्री काळभैरव प्रतिमेचे पूजन झाले. सविता चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती. सीईओ डी. के. मायदेव यांनी स्वागत केले. ज्येष्ठ संचालिका मीना रिंगणे, संचालक महेश मजती यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संचालक डॉ. संजय चौगुले, रेखा पोतदार, प्रा. महावीर मरजे, प्रा. वसंत कुरळे, संदीप कागवाडे, राजेंद्र पाटील व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शाखाधिकारी सुशांत जिजगोंडा यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Feb 25, 2024 Page No. 15
newspaper.pudhari.co.in